**<u>नियमित दिवाणी दावा क्र.</u>** - १०१/२०१५

राजेंद्र दत्तात्रेय जाधव व इतर . . . वादी

***विरूध्द***

भाउसाहेब बबन जाधव व इतर . . . प्रतिवादी

**<u>निशाणी क्र. - ३१ वरील आदेश</u>**

<u>(घोषित दिनांक - ०२/०५/२०१८)</u>

१. वादीने सदरचा दावा मिळकतीची मोजणी होण्यासाठी व अतिक्रमण निघाल्यास कब्जा मिळण्यासाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केला असून दाव्याच्या निकालापावेतो सदर प्रकरणात मनाई हुकूम देखील मागितला आहे. शिवाय **निशाणी क्र. ३१** प्रमाणे सदर जमिनीचे मोजमाप होवून न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची मागणी केली आहे. त्यांच्या कथनानुसार प्रतिवादींनी वादींच्या क्षेत्रात अतिक्रमण केले आहे किंवा नाही व केले असल्यास किती क्षेत्रात अतिक्रमण केले आहे हे शाबित होण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची मागणी केली आहे.

२. प्रतिवादींनी **निशाणी क्र. ३३** वर सदर अर्जाचा खुलासा दिला आहे व सदरचा अर्ज दाखल करता येवू शकत नसल्याचे व वादी पुरावा गोळा करत असल्यामुळे अर्ज रद्द करण्याची मागणी केली आहे.

३. अर्ज व म्हणणे यामध्ये आलेल्या कथनांवरुन खालील वादबिंदु विचाराकरिता माझ्यासमोर उपस्थित झाले व त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे देत आहे -

| **अ.क्र.** | **वादबिंदु** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीचा न्यायालयीन आयुक्त नियुक्त करण्याचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | **... नकारार्थी.** |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>वादबिंदु क्र. १ करिता</u>** -

४. दोन्ही वकिलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. मुळात न्यायालयीन आयुक्त नेमण्याचा

अर्ज हा असणारी स्थिती अधिक स्पष्ट होण्यासाठी नियुक्त करणे योग्य ठरते. परंतु पुरावा जमा करण्याकरीता न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करता येवू शकत नाही. त्यामुळे वादीचे व प्रतिवादींचे कथन प्रथम विचारात घेणे योग्य ठरेल.

५. वादींनी मुळातच मुळ दाव्यात प्रथम मागणी ही केली आहे की, गट क्र. ३८१ चे ७/१२ उता-यावरील क्षेत्राप्रमाणे तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, चांदवड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक होवून उता-यावरील व खरेदीखताप्रमाणे मोजणी करून व हद्दी निशाण्या दाखवून नकाशा सादर करण्याची मागणी केली आहे. दाव्यात व त्याच्या अर्जात असे नमुद केले आहे की, गट क्र. ३८१ व ३३८ या मिळकतींच्या दरम्यान पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी ४-५ फुटाची नाली असून गट क्र. ३८१ च्या उत्तर-पूर्व बाजूने पूर्व-पश्चिम असा कडवा कालवा असा गेलेला आहे व ०.१८ आर क्षेत्र हे कालव्यासाठी संपादित झालेले आहे. उपरोक्त नाला बंद झाला असून प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी त्यावरील झाडे जून २०१४ मध्ये काढून घेतली होती व नाला बुजवायचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांनी भूमि-अभिलेखामार्फत मोजणी क्र. २७२०/२०१४ यामार्फत मोजणी केली तथापि, भुमि-अभिलेख यांनी हद्दीच्या निशाण्या दाखविलेल्या नाहीत. त्यामुळे वादीचे ७/१२ उता-यावरील गट क्र. ३८१ वरील क्षेत्र १.४४ आर याची पूर्णमोजणी होवून तशा हद्दी निशाण्या दाखविणे व त्यात प्रतिवादींनी अतिक्रमण केल्यास ते स्पष्ट दाखविणे आवश्यक आहे व त्यासाठी त्यांनी सदरचा मोजणीचा अर्ज दिलेला आहे. मध्यंतरी नंदु दिनकर जाधव व दिनकर नामदेव जाधव (वादी क्र. ५) यांच्यात समजोता होवून गट क्र. ३४० संदर्भात मोजणी करण्याचादेखील समजोता झालेला आहे व तसे समजोतापत्र देखील त्यांनी सादर केलेले आहे.

६. सदर अर्जावर प्रतिवादींनी निशाणी क्र. ३३ वर खुलासा दिला असून वादींचे सर्व कथन नाकारलेले आहेत. यापूर्वीच मोजणी झाली असून त्यात कुठलेही अतिक्रमण झालेले नाही असे नमुद केले आहे व वादींचा अर्ज रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

७. मुळात गट क्र. ३८१ चे पोट हिस्से यापूर्वी झालेले नसून भुमि-अभिलेखामार्फत मोजणी देखील झालेली नाही. अशापरिस्थितीत भुमि-अभिलेखामार्फत त्यांची मोजणी करता येवू शकत नाही. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता प्रकरण ९ मध्ये कलम १३२ ते १४६ हे सिमा व

सिमा चिन्हांबाबत नमुद करण्यात आले असून गावाच्या सिमा कलम १३२ प्रमाणे निश्चित करण्याची पद्धत दिलेली आहे. शिवाय, कलम १३४ प्रमाणे शेतांच्या अथवा धरणांमधील जमिनीच्या सिमेबाबत मोजणीची कार्यपद्धती कलम १३४ मध्ये नमुद केलेली आहे. मोजणी करतांना काही वाद झाल्यास जिल्हाधिकारींमार्फत चौकशी करून वाद निकालात काढण्यात येईल अशा तरतुदी कलम १३५ मध्ये स्पष्टपणे नमुद केलेल्या आहेत. किंबहुना, पोट विभागाची आखणी करतांना कलम १३६ प्रमाणे महाशय जिल्हाधिका-यांकडे अर्ज देवून त्याची पुढील तरतुदीदेखील त्यात नमुद केलेल्या आहेत. अशा सर्व स्पष्ट तरतुदी असतांना त्या तरतुदींचा कुठलाही उपयोग न करतांना सरळ दिवाणी न्यायालयात प्रतिवादींनी अतिक्रमण केलेले आहे अशा मोघम तक्रारींच्या आधारावर दावा दाखल केला असून तो कितपत चालू शकतो याबाबत देखील शंका आहे. कलम १४१ प्रमाणे जिल्हाधिका-यांना सर्व अधिकार असल्यामुळे विनाकारण न्यायालयाचा वेळ खर्च करणे योग्य ठरत नाही. प्रतिवादींनी नेमके किती अतिक्रमण केले आहे ते देखील दाव्यात नमुद केलेले नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ७ रूल ३ प्रमाणे कच्चा नकाशादेखील वादींनी सादर केलेला नाही. महाशय जिल्हाधिका-यांमार्फत पोट हिस्से मोजणी होवून ७/१२ उतारे स्वतंत्र तयार होणे अपेक्षित असून तसे पोट हिस्से न झाल्यामुळे केवळ कागदोपत्री दर्शविणारा पोट हिस्सा मोजणी अधिका-यांना मोजणी करता येवू शकत नाही. कारण त्यांच्याकडे तसा अभिलेखदेखील तयार नसतो. शिवाय वादींची दाव्यातील मुख्य मागणी ही दोन्ही पक्षकारांना पुरेशी संधी दिल्याशिवाय अंतरिम स्थितीत कायमस्वरूपी मान्य करता येवू शकत नाही.

८. मुळात वादींचे कथन असे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी वादीच्या क्षेत्रात अतिक्रमण केले आहे किंवा नाही व केले असल्यास किती क्षेत्रात अतिक्रमण केले आहे हे शाबित होण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची मागणी केली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, वादी हे स्वतः खात्रीशिर सांगू शकत नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी वादींच्या क्षेत्रात अतिक्रमण केले आहे किंवा नाही. किती अतिक्रमण केले हे वादींनी स्पष्टपणे नमूद केलेला नाही अथवा त्याबाबत त्याचा कच्चा नकाशा देखील त्यांनी सादर केलेला नाही. अशापरिस्थितीत वादी हे केवळ पुरावा गोळा करण्यासाठी तसा अर्ज करून न्यायालयीन आयुक्त नेमणूकीची मागणी करत आहे. त्यामुळे त्याचा सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी **वादबिंदू क्र. १** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**वादबिंदु क्र. २ करिता** -

९. उपरोक्त वादीबिंदू क्र. १ चे उत्तर **नकारार्थी** आल्यानंतर स्वभाविक वादींचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे **वादविंदु क्र. २** करीता खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वादींचा अर्ज **निशाणी क्र. ३१** चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

दिनांक - ०२/०५/२०१८

(**के. जी. चौधरी**)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, चांदवड.